EPW

# चीनबाबतचा अविचारी शत्रुभाव

*अमेरिकेचा पाठिंबा मिळण्याची अजिबात शक्यता नसताना चिनी नियंत्रणाखालील डोकलाममधून भारतीय दलांना शांतपणे माघारी बोलावलं जाईल का?*

सिक्कीम क्षेत्रातील चिनी बाजूच्या डोकलाम वा डोंगलांग पठारावर सुरू असलेलं रस्त्याचं बांधकाम थांबवण्यासाठी भारतीय दलांनी सिक्कीम क्षेत्रातील भारत-चीन सीमारेषा २६ जून रोजी पार केली. त्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी वॉशिंग्टन डीसीमध्ये होते आणि डोनाल्ड ट्रम्प सरकारच्या 'अमेरिकेला प्राधान्य' देण्याच्या धोरणाबाबत असलेले भारताचे मतभेद बिनमहत्त्वाचे असल्याचं दाखवण्याची त्यांची खटपट सुरू होती. भारत व अमेरिका यांच्यातील सामरिक भागीदारीच्या संभाव्य अधःपतनाविषयी केवळ मोदी व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोव यांनाच चिंता वाटत होती असं नव्हे, तर भारतातील बड्या प्रसारमाध्यमांनीही याचा ताण घेतलेला होता. भारताच्या 'महासत्ता' बनण्याच्या आकांक्षा प्रत्यक्षात येण्यासाठी अमेरिकेसोबतची 'जागतिक सामरिक भागीदारी' महत्त्वाची असल्याची भावना भारतातील सत्ताधारी उच्चभ्रूंमध्ये आहे. चीनसोबत भारताचे दोन सीमावाद- ईशान्येतील मॅकमोन रेषा आणि वायव्येतील अक्साई चीनवरील भारताचा दावा- आधीपासून सुरू आहेत. यात भर म्हणून पंतप्रधानांच्या हिंदुत्ववादी सहकाऱ्यांनी तिसरा वादाचा मुद्दा निर्माण केला आहे. अमेरिकी साम्राज्यवादासोबत चीनविरोधी आघाडी दृढ करण्याच्या प्रयत्नातून बहुधा हा निर्णय झाला असावा. परंतु या आडमार्गाचा काही उपयोग होईल का?

मोदी सरकारनं २०१४ सालच्या मध्यात सत्तेची सूत्रं हातात घेतली, तेव्हापासून अमेरिकेच्या बराक ओबामा सरकारनं सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या नैसर्गिक विचारसरणीचा पुरेपूर लाभ घेतला आणि चीनसोबतच्या अमेरिकेच्या संघर्षात 'आघाडीवरचा' देश म्हणून भारताला पुढं केलं. अमेरिकेनं भारताला 'मुख्य संरक्षण भागीदारा'चा दर्जा दिला, यामुळं 'अमेरिकेच्या सर्वांत निकटच्या मित्रांच्या व भागीदारांच्या समकक्ष पातळीवरून' भारताशी संरक्षण तंत्रज्ञानाची देवाणघेवाण केली जाईल, असंही सांगण्यात आलं. त्यासाठी भारताला 'लॉजिस्टिक्स एक्स्चेन्ज मेमोरॅन्डम ऑफ अग्रीमेन्ट' हा करार करावा लागला, त्यानुसार भारतीय सैनिकी तळांवर अमेरिकी सैन्याला 'तैनात' करण्याची मुभा मिळाली. डिसेंबर २०१६मध्ये ट्रम्प यांनी असं सूचीत केलं होतं की, अमेरिकेच्या 'एकच चीन' धोरणाशी आपण बांधील राहाणार नाही. सर्व चीनचे एकमेव वैध सरकार म्हणून बीजिंगला मान्यता देणारं हे धोरण आहे आणि चीन व अमेरिका यांच्यातील गेल्या ४५ वर्षांचे राजनैतिक संबंध याच आधारावर सुरू आहेत. इतर सर्व वादग्रस्त द्विराष्ट्रीय मुद्द्यांवर चिनी सरकार कशा प्रकारे चर्चा करतं, यावरून आपण आपलं धोरण ठरवू, असंही ट्रम्प यांनी सूचीत केलं होतं. या

पार्श्वभूमीवर भारताच्या चीनबाबतच्या सर्व प्रदेशविषयक दाव्यांना ट्रम्प सरकारचा पाठिंबा मिळेल, अशी खात्री मोदी यांच्या सल्लागारांना वाटत होती.

दोन सीमावादांच्या संदर्भात नवी दिल्ली चीनसोबत 'चर्चा' करत असली, तरी 'वाटाघाटी' करायला नकार देते आहे. वाटाघाटी केल्यास भारताला अक्साई चीनवरचा व्यापक दावा कमी तीव्र करावा लागेल आणि मॅकमोहन रेषेच्या कायदेशीरपणाबाबत अहंकारी प्रतिपादनही मागं घ्यावं लागेल.

वास्तविक, चीनला लागून असलेल्या इतर सर्व शेजारी देशांनी चीनसोबतच्या सीमावादांमध्ये सौहार्दपूर्ण समेट घडवला आहे. याला केवळ भूतानचा अपवाद आहे, कारण हा देश प्रत्यक्षात भारतीय संरक्षणाखाली आहे. खरंतर इतिहासानं आपल्याला जिथं थांबवलं त्या सीमारेषा मान्य करायला चीनची कमी-अधिक संमती आहे. त्यामुळं वाटाघाटींमधून घडलेल्या कोणत्याही समेटामध्ये तथाकथित मॅकमोहन रेषेपर्यंतचा प्रदेश भारताकडं कायम राहील. खरंतर ब्रिटिश साम्राज्यवादी सत्तेनं अखेरच्या विस्तारवादी टप्प्यामध्ये हिसकावून घेतलेला आणि त्यामुळं चीनला गमवावा लागलेला मोठा प्रदेशही यात येतो.

तरीही भारत सकृद्दर्शनी चीनसोबतचा शत्रुभाव वाढवण्यासाठी एवढा उत्सुक का आहे? चीन, पाकिस्तान आणि भारतीय बंडखोर सशस्त्र गटांसोबत अडीच आघाड्यांचं युद्ध लढण्यास भारत तयार आहे, अशी बेजबाबदार बढाई सैन्यदलप्रमुख जनरल बिपीन राव यांनी मारली. साउथ ब्लॉक, भारतीय बडी माध्यमं आणि स्वयंघोषीत सुरक्षा तज्ज्ञ असं सुचवत आहेत की, चीन-भारत-भूतान सीमा दक्षिणेकडं सरकवण्यासाठी चीन आटोकाट प्रयत्न करत आहेत, असं झाल्यास युद्धाच्या वेळी सिलीगुडी पट्टा 'घशात घालण्या'ची चांगली संधी चीनला मिळेल. त्यामुळं पश्चिम बंगाल व उर्वरित भारताला ईशान्येतील सात राज्यांशी जोडणारा एकमेव देशांतर्गत भूपट्टा भारताच्या हातून जाईल. या अति ताणलेल्या संभाव्य घडामोडीचा आधार घेऊन भारतानं चीनचा दावा असलेल्या आणि चिनी नियंत्रणाखालच्या प्रदेशात घुसखोरी केली.

अमेरिकेसोबतच्या 'जागतिक सामरिक भागीदारी'साठी भारतानं 'सामरिक स्वायत्तते'ला तिलांजली द्यायची तयारीही गेल्या तीन वर्षांमध्ये दाखवली आहे आणि त्यातून चीनबाबतचा शत्रुभावही वाढवला आहे.

परंतु, मोदींच्या सल्लागारांच्या उत्साहावर पाणी फिरवत ट्रम्प यांनी चीनबाबत आणखी समजूतदार भूमिका घेण्याचं ठरवल्याचं दिसतं आहे. अमेरिकेसोबतच्या प्रचंड व्यापारी अतिरिक्ततेला कमी करावं यासाठी चीनचं मन वळवण्याचा उद्देश यापाठीमागं आहे, शिवाय उत्तर कोरियाची अण्वस्त्रं व क्षेपणास्त्रं यासंबंधीच्या अमेरिकेच्या मागण्या पूर्ण करण्याकरिता प्योंग्यांगवर चीननं दबाव आणावा यासाठीही त्यांनी हे धोरण स्वीकारलं आहे. विशेष म्हणजे चीनसोबतच्या तिसऱ्या सीमावादात भारताच्या भूमिकेला उघडपणे समर्थन देण्यासाठी अजून अमेरिका वा जपान यांपैकी कोणीही पुढं आलेलं नाही. वॉशिंग्टनकडून पाठिंबा मिळण्याची अत्यल्प आशा असताना, डोकलाममधील चिनी नियंत्रणाखालील प्रदेशातून भारतीय दलांना शांतपणे माघारी बोलावण्याचा निर्णय मोदी घेतील का? ●

*वाटसरूची वर्गणी द्यायची आहे असं नुसतं मनात वाटून उपयोगाचं नाही. त्यासाठी एक पाऊल तरी पुढे टाकावंच लागेल. वर्गणीसंदर्भात आमच्या कार्यालयाशी पुढील क्र.वर संपर्क साधा. भ्र. ७७७६९०२२६७*

प्रकाशन दिनांक १-८-२०१७

# आता लालूंना लक्ष्य केलं जातंय

*लालू प्रसाद यादव यांच्यावर टाकण्यात आलेल्या छाप्यांची वेळ पाहाता, ही कारवाई म्हणजे राजकीय सूड उगवण्याची कृती असल्याचे संकेत मिळतात.*

केंद्रातील प्रत्येक सरकार केंद्रीय अन्वेषण विभागाला (सीबीआय : सेन्ट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) आपल्या राजकीय विरोधकांना लक्ष्य करण्यासाठी वापरत आलं आहे. भारतीय जनता पक्ष (भाजप) सरकारच्या दृष्टीनं राष्ट्रीय जनता दलाचे (राजद) अध्यक्ष लालू प्रसाद यादव आणि त्यांचे कुटुंबीय हे लक्ष्य ठरले आहेत. आयकर विभागानं २० जून २०१७ रोजी यादव आणि त्यांच्या कुटुंबीयांविरोधात बेनामी व्यवहार (प्रतिबंधक) अधिनियम, १९८८ या कायद्याअंतर्गत तक्रारी दाखल केल्या. जमिनींशी संबंधित एक हजार कोटी रूपयांपर्यंत बनावट व्यवहार आणि करबुडवेगिरी असे आरोप त्यांच्यावर करण्यात आले. त्यानंतर लगेचच, ७ जुलै २०१७ रोजी सीबीआयनं यादव कुटुंबीयांच्या विविध मालमत्तांवर छापे टाकले. लालूप्रसाद यादव २००४-०९ या काळात केंद्रीय रेल्वे मंत्री असताना रेल्वेच्या हेरिटेज हॉटेलांची देखभाल करण्यासाठीच्या निविदा बनावटपणे एका खाजगी कंपनीला दिल्याच्या शंकेवरून यादव कुटुंबीयांविरोधात तक्रारी दाखल करण्यात आल्या. या आरोपांच्या बाबत मुख्य प्रवाहातील माध्यमांनी यादव यांच्याविरोधात निवाडा केलेला दिसतो, परंतु ही तपासप्रक्रिया राजकीय प्रेरणेतून होते आहे आणि यापाठीमागं भाजपचा हात आहे, असा दावा लालूप्रसाद यांनी केला आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपांमधील तथ्य काहीही असले, तरी लालूप्रसाद यांचं म्हणणं पूर्ण चुकीचं नसावं.

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं (रालोआ) सरकार त्यांच्या विरोधकांच्या बाबतीत अभूतपूर्व असहिष्णूता दाखवतं आहे. आपल्या अधिकाराला पक्षातून किंवा बाहेरून कोणत्याही प्रकारचा विरोध झाल्यास त्याचा कठोरपणे बिमोड करण्यासाठी मोदी व भाजप अध्यक्ष अमित शाह हे दोघेही प्रसिद्ध आहेत. गुजरातमध्ये २००० साली भाजप सत्तेत आला तेव्हाही ही वृत्ती दिसून आली होती. या वेळी, काँग्रेस पक्ष आणि आम आदमी पार्टी यांच्यानंतर लालूप्रसाद यादव व राजद हे भाजपच्या या वृत्तीचं पुढील राजकीय लक्ष्य असल्याचं दिसतं आहे. या तपासाची वेळ आणि वेग पाहाता, या पाठीमागं भाजपचा हात असल्याचा लालूप्रसाद यांचा आरोप प्रस्तुत ठरतो. अलीकडंच झालेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडकणुकीमध्ये विरोधकांची एकजूट दिसावी, यासाठी रालोआमध्ये सामील नसलेल्या बहुतांश पक्षांनी संयुक्त उमेदवार उभा करण्यासंदर्भात मे २०१७पासून चर्चा सुरू केली होती. लोकसभेत भाजपचं बहुमत असल्यामुळं विविध विधेयकं आणि सुधारणा मंजूर करून घेणं सत्ताधाऱ्यांसाठी सुकर बनलं आहे, अशा वेळी विधेयकं संसदेकडं पुनर्विचारासाठी परत पाठवण्याचा राष्ट्रपतींचा नकाराधिकार महत्त्वाचा ठरू शकतो. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी राष्ट्रपतीपदाच्या एका उमेदवारामागं सर्वतोपरी बळ उभं करणं उचित ठरणार होतं. विरोधकांच्या या उदयोन्मुख ऐक्यातील एक महत्त्वाचा चेहरा आणि आवाज लालूप्रसाद यादव यांचा होता, त्यामुळं साहजिकपणे सत्ताधारी पक्षाचा रोष त्यांनी ओढवून घेतला.

भाजप आणि यादव यांच्यातील या शत्रुभावाचा दीर्घ इतिहास आहे. भाजपशी कधीही युती न केलेल्या एकमेव प्रादेशिक पक्षाचे नेते लालूप्रसाद

यादव आहेत. भाजप आणि पक्षाची मातृसंस्था असलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या सांप्रदायिकतावादाविरोधातही यादव यांनी सातत्यानं भूमिका घेतली आहे. सांप्रदायिक तणाव वाढवल्याबद्दल ऑक्टोबर १९९०मध्ये लालकृष्ण अडवाणी यांना लालूप्रसाद यांनी अटक केली होती आणि राम रथयात्रा बिहारमार्गे अयोध्येला जाण्याला त्यांनी प्रतिबंध केला होता. इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल वीकलीमधीलच पूर्वीच्या एका लेखात (व्हेअर इज कास्ट इन डेव्हलपमेन्ट? बिहार असेम्ब्ली इलेक्शन्स २०१५, ७ नोव्हेंबर २०१५) असा युक्तिवाद करण्यात आला होता की, मागासवर्गीय नेते असलेल्या लालूप्रसाद यांनी २०१५च्या निवडणुकीत भाजपचा सांप्रदायिकतावाद आणि ब्राह्मण्य यांच्यातील दुवे उलगडून दाखवले (माधव सदाशिव गोळवलकर आणि मोदी यांनी आरक्षण व अल्पसंख्याकांविषयी केलेल्या विधानांचा संदर्भ त्यांनी यासाठी दिला) आणि भाजपच्या गोमांसाच्या राजकारणाला विरोध केला (यासाठी त्यांनी हिंदूंमधील गोमांसभक्षणाच्या पद्धतींची नोंद करणाऱ्या वाङ्मयाचा आधार घेतला). या दोन धीट भूमिकांद्वारे या निवडणुकीत लालूप्रसाद यांना भाजपचा पराभव करण्यात यश मिळालं. त्यामुळं भाजपला विचारसरणीय आव्हान देण्याचं काम त्यांनी केलं. बिहारमधील निवडणुकीमध्ये मिळालेल्या यशानंतर त्यांनी राष्ट्रीय राजकारणातही स्वतःला अधिक व्यापक भूमिका मिळण्याच्या दृष्टीनं पावलं उचलली. त्यासाठी त्यांनी काँग्रेस व इतर सेक्युलर पक्षांचा पाठिंबा मिळवला.

दुसरीकडं २०१४पासून लक्षणीय विजय मिळवणाऱ्या भाजपला बिहारमध्ये निवडणुकीत पराभव झाल्याच्या वेदना अजूनही डाचत आहेत. २०१९ सालच्या निवडणुकीत (आघाडी करून अथवा न करता) पूर्ण बहुमत टिकवायचं असेल, तर भाजपला बिहार राज्य महत्त्वाचं ठरणार आहे. हे साध्य करण्यासाठी राजद आणि नीतिश कुमार यांचा जनता दल (संयुक्त) यांच्या महाआघाडीमध्ये फूट पाडावी लागेल. या पार्श्वभूमीवर, लालूप्रसाद यादव बिहारमध्ये सत्तेत येण्यानं गुंडांचं राज्य प्रस्थापित झाल्याचा भाजपचा प्रचार सुरू आहे, त्याला खतपाणी पुरवण्याच्या दृष्टीनं लालूप्रसाद व त्यांच्या कुटुंबीयांवरील भ्रष्टाचाराचे आरोप लाभदायक ठरले आहेत. स्वच्छ सरकारचं आश्वासन दिलेल्या नीतिश कुमार यांनाही अवघड परिस्थितीत टाकण्यासाठी हे चौकशीसत्र पूरक ठरलं आहे. भाजपनं २०१४च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये मोदींना पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून उभं करण्याचं ठरवल्यानंतर कुमार यांनी १७ वर्षांची आघाडी तोडून रालोआतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. सध्या नीतिश कुमार यांना पुन्हा रालोआकडं आकर्षित करून बिहारमधील महाआघाडी कोलमडवण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत कुमार यांनी सत्ताधारी पक्षाला पाठिंबा दिल्यामुळं भाजपच्या प्रयत्नांना यश येत असल्याचं भासत असलं तरी ही प्रक्रिया उलटीही फिरू शकते.

लालूप्रसाद यादव हे मुरलेले राजकारणी आहेत. इतर अनेक घडामोडींसोबतच चारा घोटाळ्याची मानहानी सहन करून ते पुन्हा बिहारच्या राजकारणावर प्रभुत्व गाजवण्याच्या स्थानी येऊन पोचले आहेत. त्यांच्या ग्राम्य प्रेरणा, प्रामाणिकपणा आणि चिकाटी हे सर्व गुण बिहारमधील ग्रामीण मतदारवर्गाशी जोडून घेणारे आहेत आणि यामुळंच अनेक वादळांना तोंड देऊनही लालूप्रसाद टिकून आहेत. भाजपनं त्यांच्याविरोधात उघडलेल्या आक्रमक सूडमोहिमेचा विपरित परिणाम होण्याचीही मोठी शक्यता आहे. सीबीआयनं छापे टाकल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना लालूप्रसाद यांनी आपल्या विरोधकांना इशारा देताना सांगितलं की,

भाजप व मोदी यांच्या सांप्रदायिकतावादी भूमिकेविरोधात आपण आपलं काम सुरूच ठेवू, मग त्यातून आपलं राजकीय अस्तित्त्व पणाला लागलं तरी हरकत नाही. या निर्धाराचा शेवट कदाचित लालूप्रसाद यांची राजकीय कारकीर्द खरोखरच संपुष्टात येण्यामध्ये होऊ शकतो. परंतु, विरोधकांपेक्षा वरचढ ठरायचं असेल तर लालूप्रसाद यांनी २०१५च्या निवडणुकीतील आश्वासनानुसार सक्रिय व्हायला हवं. सांप्रदायिकतावादाविरोधातला लढा रस्त्यावर उतरून लढायला हवा, हा लढा बिहारबाहेरही नेऊन संयुक्त विरोधी पक्षांच्या सोबतीनं लढला जायला हवा. ●

---

## एअर इंडियाबाबतची फसवणूक

*एअर-इंडियामध्ये २०१२ साली सुरू झालेल्या सुधारणाप्रक्रियेला पाच वर्षं बाकी असताना या कंपनीचं खाजगीकरण करण्यात काय मतलब?*

आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७मध्ये एअर-इंडियाचं वर्णन सातत्यानं ना-नफा स्वरूपाची राहिलेली सार्वजनिक क्षेत्रातील हवाई वाहतूक कंपनी असं अन्यायकारकरित्या करण्यात आलं. आता या कंपनीचं खाजगीकरण केलं जाणार आहे. नीती आयोगानं शिफारस केल्यानंतर संसदीय समितीनं एअर-इंडियाच्या खाजगीकरणाला लगेचच तत्त्वतः मान्यता दिली. विद्यमान सरकारच्या कार्यपद्धतीनुसार संबंधित घटकांशी सल्लामसलत न करता घाईगडबडीनं हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळं एअर-इंडियाच्या कर्मचारी संघटनांनी औद्योगिक अशांतता माजू शकेल अशी धमकी दिली आहे.

विपरित परिस्थितीशी संघर्ष करणाऱ्या इतर अनेक हवाई वाहतूक कंपन्यांमध्ये एअर-इंडिया या सरकारी कंपनीचाही समावेश आहे आणि २०१२साली या कंपनीच्या पुनर्वसनाचा दहा वर्षांचा कार्यक्रम सुरू झाला, तो अजूनही सुरू आहे. या कंपनीनं २०१५-१६ या वर्षामध्ये अपेक्षेपेक्षा वेगानं कामकाजीय नफा नोंदवला आणि निव्वळ तोटाही कमी केला. पुनर्वसन कार्यक्रमाचा परिणाम दिसू लागण्याच्या आधीच कंपनीनं ही कामगिरी केली होती. शिवाय कमी खर्चिक सह-कंपनी असलेल्या एअर इंडिया एक्सप्रेसनंही नफा मिळवला. या दोन कंपन्यांनी २०१६-१७ या वर्षात आधीच्या वर्षापेक्षाही चांगली कामगिरी केल्याचं समजतं. हवाई वाहतूक कंपनीची कामगिरी मोजण्याचा एक निकष प्रवाशांच्या जागा भरण्याची क्षमता हा आहे; या निकषानुसार एअर-इंडिया व एअर-इंडिया एक्सप्रेस या दोनही कंपन्यांची कामगिरी गेल्या पाच वर्षांमध्ये स्थिर गतीनं सुधारते आहे. एकूण भारतीय हवाई वाहतूक क्षेत्रानंही एक दशक अडीअडचणींना सामोरं गेल्यानंतर या वर्षामध्ये चांगली कामगिरी केली. प्रवाशांच्या संख्येमध्ये सातत्याने वाढ झाली आहे, त्यामुळं या दशकाच्या अखेरीला भारत हा तिसरी सर्वांत मोठी हवाई वाहतूक बाजारपेठ बनणं अपेक्षित आहे. या घडामोडी आशादायक आहेत. देशांतर्गत प्रवाशांची वार्षिक संख्याही पुढील वर्षी १० कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. भारतातील नागरी हवाई वाहतुकीचं भवितव्य जगातल्या इतर ठिकाणच्या हवाई क्षेत्रापेक्षा खूप उज्ज्वल आहे. साहजिकपणे या क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीची मर्यादा आणखी शिथील करण्यात आली आणि देशांतर्गत हवाई वाहतुकीमध्ये १०० टक्के परकीय गुंतवणुकीला परवानगी देण्यात आली. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाराजा एअर-इंडियाचं

खाजगीकरण करण्याचा निर्णय घेताना सरकार सुधारणाभिमुख असल्याचा आव आणत असलं, तरी प्रत्यक्षात या सरकारी कंपनीच्या बाबतीत फसवणूकच होते आहे.

एअर-इंडियाचं खराब वित्तीय आरोग्य आणि गैरव्यवस्थापन यांमुळं हा निर्णय अपरिहार्य बनला होता, असं सरकार आपल्याला पटवून देईल. परंतु, हा निर्णय सरळसरळ विचारसरणीतून प्रेरित झालेला आहे आणि केवळ काही खाजगी हवाई वाहतूक कंपन्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. एअर-इंडिया किंवा कंपनीचा कर्मचारी वर्ग यांच्या हिताचा विचार मात्र या निर्णयामध्ये अजिबात करण्यात आलेला नाही. किंबहुना या क्षेत्राला आणि ग्राहकांनाही हा निर्णय अडचणीचाच ठरण्याची शक्यता आहे.

सरकार काहीही सांगत असले तरी वाईट कामगिरी करणारी एअर-इंडिया ही एकमेव हवाई वाहतूक कंपनी नाही. भारतातील (किंगफिशर एअरलाइन्ससह) इतरही खाजगी हवाई वाहतूक कंपन्यांना या क्षेत्रात स्थिर होण्यामध्ये अडचणी येत होत्या. उदारीकरणानंतर हे क्षेत्र गुंतवणुकीसाठी खुलं करण्यात आलं, त्यानंतर अनेक कंपन्यांनी कामकाज सुरू केलं. यातील सुमारे २३ कंपन्या बंद झाल्या किंवा इतर कंपन्यांमध्ये विलीन करण्यात आल्या आणि विलीन करून घेणाऱ्या या कंपन्याही नंतर बंद पडल्या किंवा त्यांनी कामकाज थांबवलं. कामकाज सुरू ठेवलेल्या अनेक हवाई कंपन्यांनी गेल्या दशकामध्ये तोटाच सहन केला आहे. कच्च्या तेलाच्या जागतिक किंमती कमी होण्याआधीच्या काळात या क्षेत्राला अनेक अडचणींना सामोरं जावं लागत होतं. भारतात झोतयंत्रासाठीच्या इंधनाचा खर्च तुलनेनं जास्त आहे, शिवाय अतिरिक्त क्षमता आणि जास्त वाहतुकीच्या मार्गांची कमतरता याही अडचणी होत्या.

एअर-इंडियानं कधीही नफा कमावला नाही आणि ती कधीही नफादायक बनणार नाही, आणि अकार्यक्षम व्यवस्थापनाचा हा परिणाम आहे- हे म्हणणं मुळातच अतिशयोक्तीपूर्ण आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या करदात्यांच्या पैशांवर चालतात या साचेबद्ध मांडणीचा आधार घेऊन एअर-इंडियाच्या खराब वित्तीय कामगिरीकडं बोट दाखवण्यात येतं. गेल्या दीड दशकामध्ये सरकारी कंपन्यांसाठी १११ विमानं खरेदी करण्यात आली, या वादग्रस्त निर्णयाची चौकशी अजूनही सुरू आहे. शिवाय इंडियन एअरलाइन्स (या पूर्वी मुख्यत्वे देशांतर्गत प्रवाशांच्या सेवेसाठी असलेल्या सरकारी कंपनीला) २००७ साली एअर इंडियामध्ये विलीन करण्यात आलं; वाईट नियोजन आणि अंमलबजावणीचा नमुना ठरलेल्या या निर्णयाची चौकशीही सुरू आहे. या दोन सरकारी निर्णयांमुळं मुख्यत्वे एअर इंडियाच्या डोक्यावरचा कर्जाचा बोजा अवाजवी वाढला.

अशा परिस्थितीत एअर इंडियाच्या संभाव्य विक्रीआधी सरकारला या कंपनीचं कर्ज किमान अंशतः माफ करावंच लागेल. मालमत्ता विक्री आणि पुनर्रचित कर्जं या मार्गानं काही प्रमाणात तरी कर्जाचा बोजा कमी होईल. खाजगीकरण न करताही हे शक्य आहे, कारण एअर इंडियाच्या कामकाजामध्ये आधीच सुधारणा होत आहे. सरकारी बँकांना याहून जास्त कर्जांचं देणं असलेल्या खाजगी कंपन्यांना कर्जपरताव्यासाठी पुरेशी संधी दिली जाते, अशा वेळी सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी असलेल्या एअर इंडियालाही तिची कर्जं परत करण्यासाठी संधी द्यायला हवी. काही गंभीर त्रुटींवर उपाय करण्यासाठी एअर इंडिया कार्यरत असताना अशा संधी निकडीच्या आहेत. कर्मचारीवर्गाच्या संख्येबाबतची समस्या सोडवण्यात आली आहे, परंतु सेवेचा दर्जा आणि विश्वासार्हता यांबाबत आणखी सुधारणा करण्याची गरज आहे. उच्च

दर्जाच्या सेवा कार्यक्षमतेनं पुरवण्यासाठी आपल्या कर्मचारीवर्गामध्ये एअर इंडियानं आणखी गुंतवणूक करण्याची गरज आहे.

भारतातील नागरी हवाई वाहतुकीची बाजारपेठ, जगातील बहुतांश ठिकाणी असतं त्याप्रमाणे, मोजक्या कंपन्यांच्या हातात आहे. विविध निकषांनुसार भारतीय हवाई वाहतूक बाजारपेठेतील दुसरा वा तिसरा सर्वाधिक वाटा एअर इंडियाचा आहे, या क्षेत्रातील ३१ टक्के विमानं या कंपनीच्या मालकीची आहेत आणि जगभरातील विमानतळांवर प्राधान्यानं वेळही तिला दिली जाते. या पार्श्वभूमीवर ही प्रस्थापित सरकारी कंपनी बाजारपेठेतून बाहेर जाण्यामुळं अथवा दुसऱ्या एखाद्या कंपनीत विलीन होण्यामुळं या बाजारपेठेतील सत्ता काही मोजक्या बड्या खाजगी कंपन्यांच्या हातात केंद्रीत होईल. हा स्पर्धात्मकतेविरोधात जाणारा अयोग्य पायंडा ठरेल. मोजक्यांच्या हातात सूत्रं राखणाऱ्या क्षेत्रामध्ये इतकी मोठी सरकारी कंपनी टिकून राहाणं इष्ट आहे आणि गरजेचंही आहे.

एअर इंडियावर विखारी टीका करण्याऐवजी सरकारनं पुनर्वसनाच्या कार्यक्रमाचा परिणाम समोर येण्यासाठी ठरवलेला वेळ पूर्णपणे द्यायला हवा. घाईगडबडीत या कंपनीचं खाजगीकरण करणं योग्य नाही. इंधनाच्या किंमती आणि बाजारपेठेतील परिस्थिती अशा विविध संकेतांनुसार, एअर इंडिया ही सरकारसाठी आधीप्रमाणेच नफादायक कंपनी ठरेल, असं स्पष्ट होतं आहे. ●

---

## घरकामगारांविरोधातील पूर्वग्रह

*घरकाम करणाऱ्यांसंबंधीचा सर्वांगीण कायदा निकडीचा बनला आहे.*

नोएडामधील उच्चउत्पन्न गटातील लोक राहात असलेल्या एका गृहसंकुलामध्ये घरकामगार आणि त्यांचे रोजगारदाते यांच्यात १२ जुलै रोजी वाद झाला. हा वाद नंतर वाढत जाऊन त्याचं रूपांतर वर्गकलहामध्ये झालं आहे आणि त्याला मुस्लीमविरोधी भावनांची किनारही आहे. महागुन मॉडर्न सोसायटीमध्ये मोलकरणीचं काम करणारी २७ वर्षीय ज़ोहरा बीबी दिवसभराचं काम करून जवळच असलेल्या झोपडपट्टीमधल्या तिच्या घरी नेहमी जाते तशी त्या दिवशी पोचलीच नाही, इथपासून हा घटनाक्रम सुरू झाला. या सर्व घडामोडींमध्ये पोलीस आणि सरकार यांनी घरकामगारांविरोधात स्पष्ट पूर्वग्रह दाखवून दिला. ज़ोहरा बीबी यांच्या पतीने रात्री पोलिसांच्या हेल्पलाइन क्रमांकावर फोन केल्यानंतर या दोन हजार फ्लॅटच्या सोसायटीची पोलिसांनी ओझरती तपासणी केली. दुसऱ्या दिवशी सकाळी ज़ोहरा यांच्याबाबत चौकशी करण्यासाठी सोसायटीच्या गेटवर जमा झालेल्या झोपडपट्टीवासीयांच्या गटाशी चर्चा करतानाही पोलिसांनी असंवेदनशीलता दाखवली. यातून दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली. सुरुवातीची सोसायटीची तपासणी पोलिसांनी किमान प्रामाणिकपणा दाखवत केली असतील, तर ही समस्या इतकी चिघळली नसती. अशाच प्रकारे एखाद्या बेपत्ता इसमाविषयी फोन करणारी व्यथित व्यक्ती उच्चभ्रू पार्श्वभूमीची असती, तर पोलिसांनी अशाच प्रकारे कार्यवाही केली असती का? हा प्रश्न निर्माण होतो.

या प्रकरणात रोजगारदाते सोसायटीनिवासी आणि बिल्डर यांनी दाखल केलेल्या तीन तक्रारींबाबत पोलिसांनी वेगानं कार्यवाही केली, आणि झोपडपट्टीमधील १३ लोकांना अटक केली.

परंतु आपल्या रोजगारदात्यांनी आपल्याला मारहाण केल्याची तक्रार ज़ोहरा बीबी यांनी केल्यावरही त्याबाबतचा तपास मात्र पुढं सरकला नाही. यावरून पोलीस कुठल्या बाजूला उभे आहेत हे स्पष्ट होतं. याहून जास्त निलाजरेपणा दाखवत स्थानिक खासदार आणि केंद्रीय सांस्कृतिक मंत्री महेश शर्मा यांनी न्यायाधीश असल्याप्रमाणे या प्रकरणात निवाडाच जाहीर केला. सोसायटीतील रहिवाशांची काहीही चूक नाही, आणि अटक झालेल्या झोपडपट्टीवासियांना पुढील कितीतरी वर्षांमध्ये जामीनही मिळणार नाही अशी तजवीज आपण करू, असं शर्मा म्हणाले. त्यांनी घरकामगारांशी संवादही साधला नाही. केवळ सोसायटीवासीयांशी बोलताना ते म्हणाले, या देशातील कोणालाही कायदा आणि सुव्यवस्था स्वतःच्या हातात घेण्याचा अधिकार नाही. भारतीय जनता पक्षाचं सरकार तीन वर्षांपूर्वी सत्तेत आल्यापासून हिंदुत्ववादी गटांशी संलग्न असलेले जमाव मुस्लिमांवर हल्ले करून त्यांचे खूनही पाडत आहेत, याचा या मंत्रिमहोदयांना बहुधा विसर पडला असावा.

यानंतर सोसायटीवासीयांच्या एका मोठ्या गटानं आणि पोलीस व सरकार यांनी घरकामगारांना धमकावण्याचाही प्रयत्न केला. वर्गसत्तेची प्रतिक्रिया कशी असते हे यातून दिसून आलं. झोपडपट्टीला लागून असलेली अनेक दुकानं नोएडा नागरी प्रशासनानं पाडली. स्थानिक रहिवाशांची ही दुकानं सरकारच्या जमिनीवर अतिक्रमण करून बांधण्यात आल्याचा दावा प्रशासनानं केला. सध्या देशात मुस्लीम असणं किंवा मुस्लीम असल्यासारखं दिसणं हे एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवण्यासाठी पुरेसं आहे, हा सामाजिक पूर्वग्रह पोलिसांच्या या प्रकरणातील कार्यवाहीतही दिसून आला. महागुन सोसायटीमधील सुमारे सहाशे घरकामगारांपैकी बरेच जण पूर्व बंगालमधून आलेले आहेत, त्यामुळं या पूर्वग्रहाला असलेली आणखी एक किनार कार्यरत झाली. बांग्लादेशातील बेकायदेशीर स्थलांतरित असल्याचा आरोप टांगत्या तलवारीसारखा या लोकांच्या डोक्यावर कायम टांगता असतो. या प्रकरणातही हेच घडलं- झोपडपट्टीवर छापे टाकत पोलिसांनी रहिवाशांना त्यांची भारतीय असल्याची ओळख सिद्ध करण्यास सांगितलं. झोपडपट्टीवासीयांच्या भारतीयत्वाचा मुद्दा सोसायटीसोबतच्या संघर्षापूर्वी उपस्थित झाला नव्हता.

देशातील सुमारे दोन कोटी घरकामगारांच्या अधिकारांची दखल घेणारा सर्वांगीण स्वरूपाचा कायदा करणं निकडीचं आहे, हे या घटनेच्या निमित्तानं अधोरेखित झालं. असंघटित क्षेत्रातील सर्वांत धोकाग्रस्त अवकाशात हे लोक काम करत असतात, कारण यात बहुतांश स्थलांतरित महिला असतात. या संदर्भात कायदा झाला तर त्यातून घरगुती कामाला श्रम म्हणून मान्यता मिळेल आणि समाजात घरकामाचं जे अवमूल्यन होतं त्यावरही अंशतः उपाय साधला जाईल. आत्तापर्यंत सरकारांनी या संबंधीच्या धोरणांचे मसुदे तयार केले असले, तरी अजून त्यातून कायदा निर्माण झालेला नाही. कमी वेतन, जास्तीचं काम, कामाचा लांबणारा कालावधी, अशा प्रकारची रचनात्मक पिळवणूक घरकामगारांना नियमितपणे सहन करावी लागते. शिवाय, रोजगारदात्यांनी घरकामगारांना डांबून ठेवल्याच्या आणि मारहाण केल्याच्या घटनाही भीतीदायक नियमितपणे प्रकाशात येत आहेत. हे कामगार बंद दरवाज्याआड काम करतात, त्यामुळं त्यांच्यासमोरचे धोके आणखीच वाढत जातात.

देशातील अर्ध्या राज्यांनी घरकामगारांना किमान वेतन अधिनियमाच्या कक्षेत आणलं आहे, त्यामुळं त्यांचं वेतन, कामाचे तास आणि सुट्ट्या यांचं नियमन झालं आहे. परंतु नोएडा ज्या राज्यात येतं ते उत्तर प्रदेश आणि दिल्ली, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या

राज्यांमध्ये अजूनही या घरकामगारांना कायद्याच्या कक्षेत आणण्यात आलेलं नाही. अर्थात, किमान वेतन अधिनियमही अतिशय अपुऱ्या व्याप्तीचा कायदा आहे. उदाहरणार्थ, घरकामगारांना व रोजगारदात्यांना कोणत्याही अधिकारीसंस्थेकडं नोंदणी करण्याची गरज या कायद्यानं नोंदवलेली नाही. दोन्ही बाजूंनी कंत्राटाशी बांधिलकी राखली जाते आहे की नाही, यावर देखरेख ठेवण्यासाठी आणि संघर्षाच्या वेळी निवाडा करण्यासाठी अशी नोंदणी महत्त्वाची ठरेल. राष्ट्रीय कायद्यानं कामगारांच्या सुरक्षेचा विचार करायला हवा, त्यांना निकडीच्या वेळी आरोग्यविषयक सहाय्य मिळेल याची तजवीज व्हायला हवी आणि इतरही अनेक गोष्टींसोबतच त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचीही सोय असायला हवी. केरळ व तामीळनाडूसारख्या काही राज्यांमध्ये घरकामगारांसाठी असलेल्या कल्याणकारी मंडळांद्वारे असे प्रयत्न केले जातात, परंतु त्यांना अत्यल्प निधी उपलब्ध असतो त्यामुळं त्यांचे प्रयत्न फारसे परिणामकारक ठरत नाहीत. घरकामगार पुरवून नफा कमावणाऱ्या काही मध्यस्थ संस्थाही आता निर्माण झाल्या आहेत, त्यात मुलांनाही कामाला जुंपलं जात असल्याचा संशय आहे. या संस्थांचं नियमनही राष्ट्रीय कायद्याद्वारे व्हायला हवं.

नोएडातील ताज्या संघर्षावरून दिसतं त्यानुसार, या कामगारांची अतिशय वाईट कार्यपरिस्थिती आणि कामाच्या अटी सुधारण्यासाठी कायदा महत्त्वाचा असला तरी त्यातून केवळ सक्षम न्यायिक चौकट उपलब्ध होईल. या कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी घरकामगारांनी संघटित होणंही गरजेचं आहे, कारण त्यांचे रोजगारदाते आर्थिक व सामाजिकदृष्ट्या वरिष्ठ स्थानावरच असणार आहेत. भारतातील घरकामगार गेल्या दशभरामध्ये आधीच्या तुलनेत जास्त संघटित झाले आहेत, काही मोठ्या शहरांमध्ये त्यांच्या संघटनाही कार्यरत आहेत. परंतु हेही पुरेसे ठरणारे नाही, कारण अनेक रोजगारदाते सरंजामशाही वृत्तीचे असतात, ते घरकामगारांना गुलाम मानतात. अशा वेळी मालक आणि गुलाम यांच्यातील संबंध कायद्यानं नाही तर सामाजिक व्यवस्थेद्वारे आखले जातात. या सामाजिक व्यवस्थेमध्ये नीच स्थानी जन्मल्यामुळं काही लोकांना इतरांची सेवा करणं एवढं एकच काम करण्याचे निर्देश दिले जातात. ही परिस्थिती बदलायलाच हवी..●

---

## नाजूक परिस्थितीतही टिकलेली वृत्तवाहिनी

*मर्यादा असूनही 'अल-जझीरा' वृत्तवाहिनी प्रभुत्वशाली कथनांना आव्हान देते आहे.*

सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखाली इतर काही आखाती देशांनी कतारवर आर्थिक व राजनैतिक निर्बंध लादल्यानंतर १३ मागण्यांची एक यादी कतारकडे पाठवली, यामधील एक मागणी 'अल-जझीरा' ही वृत्तवाहिनी बंद करावी अशी आहे. यात फारसं काही आश्चर्य वाटण्यासारखं नाही. 'अरब जगतामधील पहिली स्वतंत्र वृत्तवाहिनी' असं स्वतःचं निक्षून वर्णन करणारी 'अल-जझीरा' १९९६ साली स्थापन झाली, आणि तेव्हापासून ती या प्रदेशातील अनेक राजेशाह्यांना आणि हुकूमशाह्यांना त्रासदायक वाटते आहे. ही वृत्तवाहिनी कतारमधून कामकाज चालवते आणि या देशात माध्यमं 'स्वतंत्र' नाहीत, असं 'फ्रिडम हाउस' या अमेरिकास्थित संस्थेनं २०१६ साली जाहीर केलं होतं, परंतु या प्रदेशात कार्यरत असलेल्या इतर समकक्ष वृत्तवाहिन्यांपेक्षा अल-जझीरा अर्थातच

जास्त स्वतंत्र आहे. इथं एक जुना संदर्भ नोंदवण्यासारखा आहे. बीबीसीची अरबी सेवा बंद करायचा निर्णय सौदी अरेबियानं घेतला, त्या वेळी तिथल्या सर्व १५० सुप्रशिक्षित पत्रकारांना एका दिवसात नवीन वाहिनीकडं- म्हणजे अल-जझीरा अरबीकडं जाता आलं होतं. या अर्थी, 'अल-जझीरा'ची अरबी शाखा सौदी अरेबियाच्या एका अनियोजित उदार कृतीमुळं जन्माला आली होती, हा उपरोधच म्हणावा लागेल.

जगभरात अल-जझीराची इंग्रजी वृत्तवाहिनी पाहिली जाते. या वाहिनीची व्यावसायिकता आणि विश्वासार्हता हेवा वाटावी अशी आहे. प्रस्थापित आंतरराष्ट्रीय वाहिन्यांचा भर पाश्चात्त्यकेंद्री वार्तांकनावर असतो, त्या उलट अल-जझीरानं अरब जगतामधील आणि उत्तर आफ्रिकेतील घडामोडींसंबंधी ताजा व अधिक मूलभूत दृष्टिकोन दाखवला आहे. परंतु अरब जगतातील एकचालकानुवर्ती सत्ताधीशांना त्रस्त झाल्यासारखं वाटण्याचं कारण अल-जझीराची अरबी वाहिनी हे आहे. प्रसारमाध्यमांचा व्यवहार अतिशय नियंत्रित स्वरूपाचा असणाऱ्या या देशांमधून कधीच समोर न आलेल्या लोकांचे आवाज या वृत्तवाहिनीच्या माध्यमातून प्रसारीत होतात. ट्युनिशिया व इजिप्तमधल्या तथाकथित 'अरब-वसंता'च्या आंदोलनांचे थेट व सखोल प्रक्षेपण करण्यामध्ये मुख्यत्वे अल-जझीरा अरबी वाहिनीचा सहभाग होता. अमेरिकेतील '९/११' हल्ल्यांनंतर ओसामा बिन लादेनची मुलाखत घेऊ शकलेली ही जगातील एकमेव वृत्तवाहिनी होती. अशा प्रकारच्या वार्तांकनामुळं या वाहिनीच्या प्रेक्षकवर्गामध्ये वाढ झाली, परंतु कतारचे शेजारी देश साशंक बनले. कतारी राजसत्ताक कुटुंबानं या वाहिनीच्या स्थापनेला सहाय्य केलं आणि अल-जझीराची अंशतः मालकीही या कुटुंबाकडं आहे. 'मुस्लीम ब्रदरहूड' या संघटनेबाबत व इतर जहाल गटांबाबत अल-जझीराची भूमिका मवाळ आहे आणि कैरोमधील ताहरीर चौकामध्ये झालेल्या निदर्शनांनाही या वाहिनीनं सक्रिय प्रोत्साहन दिलं, अशी टीका झालेली आहे. परंतु अल-जझीरानं आरोप निक्षून फेटाळले आहेत. जहाल इस्लामी गटांच्या मताला जागा देणं हे आपलं व्यावसायिक कर्तव्य आहे, असा अल-जझीराचा युक्तिवाद आहे. पण ही जाणीवपूर्वक चिथावणी असल्याचं मत असलेल्या सौदीनेतृत्वाखालील देशांच्या गटाला हा युक्तिवाद स्वीकारण्याजोगा वाटत नाही.

अल-जझीराच्या 'लाइव्ह इजिप्त' या वाहिनीचं कैरो इथलं कार्यालय २०१३ साली बंद करण्यास सांगितलं गेलं, कारण ही वाहिनी इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फत्ताह अल-सिसी यांच्याबाबत टीकेची भूमिका घेत होती. या वाहिनीनं दोहा इथून आपलं प्रसारण सुरू ठेवलं, परंतु इजिप्तच्या सरकारकडून येणाऱ्या दबावापुढं झुकून कतारी सरकारनंच ही वाहिनी बंद करून टाकली. म्हणजेच, या तथाकथित 'स्वतंत्र' वृत्तवाहिनीच्या संदर्भात कतारी सरकारही पूर्णपणे नामानिराळं राहू शकत नाही. कतारच्या राज्यघटनेतील कलम ४७ अनुसार, 'वातावरण आणि परिस्थितीनुसार' अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याची हमी देण्यात आली आहे. बादशहावर झालेली कोणतीही टीका किंवा कतारमधली परिस्थिती यांचा इथं संदर्भ आहे. २०१३ साली 'दोहा सेंटर फॉर मीडिया फ्रिडम'चे संचालक जेन केउलेन यांना अशाच कारणावरून काढून टाकण्यात आलं होतं. आखाती सहकार्य परिषदेतील सहा देशांमधील दडपशाहीच्या माध्यम कायद्यांबद्दलचा अहवाल या केंद्रानं तयार केला होता आणि कतारमध्ये अधिक माध्यमस्वातंत्र्य असावं, असं मतही मांडलं होतं. शिवाय, कतारमधील ९४ टक्के श्रमशक्तीच्या- यातील बहुतांश लोक दक्षिण

आशियातून गेलेले स्थलांतरित आहेत- कामाच्या पर्यावरणाविषयी टीकात्मक वार्तांकनही सहन केले जाणार नाही, असं कतारी सरकारनं स्पष्ट केलेलं आहे.

आपल्या मुख्य कार्यालयीन क्षेत्राबाहेरच्या दुसऱ्या देशाचा दबाव सहन करणारा अल-जझीरा हा या प्रदेशातील पहिला वृत्तसमूह नाही. दुबई मीडिया सिटीमध्ये २००७ साली 'जिओ' आणि 'एआरवाय वन वर्ल्ड' या दोन पाकिस्तानी वाहिन्या कार्यरत होत्या. या ठिकाणी सरकारकडून वार्तांकनाच्या आशयामध्ये कोणताही हस्तक्षेप होणार नाही, अशी हमी त्यांना देण्यात आली होती. परंतु संयुक्त अरब अमिरातीनं पाकिस्तानी राष्ट्राध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांची मागणी मान्य करत या वाहिन्यांची कार्यालयं बंद केली. अखेरीस तडजोड होऊन या वाहिन्यांनी बातम्या प्रक्षेपण करण्यास परवानगी नाकारण्यात आली, परंतु मनोरंजनविषयक कार्यक्रमांचं प्रसारण सुरू ठेवण्याची मुभा देण्यात आली.

अल-जझीरा इंग्रजी वाहिनीला विविध आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनांकडून पाठिंबा मिळालेला असताना या वृत्तसमूहावर बंदी आणण्याची मागणी केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील हल्ला मानता येणार नाही. अभिव्यक्तीस्वातंत्र्य अथवा माध्यमस्वातंत्र्य या संकल्पनाच अस्तित्वात नसलेल्या प्रदेशामध्ये अल-जझीराची वाढ आणि विस्तार होऊ देण्यात आला. या प्रदेशातील प्रत्येक देश एकचालकानुवर्ती तरी आहे अथवा सर्वंकष राजसत्ता तरी तिथं आहे. यातील बहुतांश सरकारांसाठी माध्यमं म्हणजे प्रचारतंत्राचं साधन आहेत आणि स्पष्टपणे आखून दिलेल्या मर्यादांमध्येच माध्यमांनी कार्यरत राहाणं अपेक्षित असतं. या मर्यादांचं उल्लंघन झालं तर पत्रकारांना नियमितपणे धमक्या मिळतात आणि अगदी तुरुंगातही डांबलं जातं. अल-जझीरानं कतारच्या देशांतर्गत राजकारणाच्या बाबतीत या मर्यादांचं पालन केलेलं असल्यामुळंच या वृत्तसमूहाला तिथं राजाश्रय मिळाला आहे. सौदीनेतृत्वाखालील देशगटाकडून होणाऱ्या मागण्यांपुढं कतार झुकेल अशी चिन्हं सध्यातरी दिसत नाहीत. तडजोड म्हणून अल-जझीरा बंद करण्याला वा त्याचा व्याप कमी करण्याला कतारनं सहमती दर्शवली तर ती दुर्दैवी घटना असेल. मर्यादित अवकाशामध्येही मतांची बहुविधता सादर करणं आणि प्रभुत्वशाली कथनांना आव्हान देणं शक्य आहे, हे अल-जझीरानं परिणामकारकरित्या दाखवून दिलं आहे, त्यामुळं ही वाहिनी बंद होणं या प्रदेशासाठी व जगासाठी हानिकारक ठरेल. ●

---

## हरित लवादाच्या स्वातंत्र्याचा संकोच

*विद्यमान सरकारसाठी राष्ट्रीय हरित लवाद खूप त्रासदायक ठरत आहे का?*

आपल्या विस्तृत राजकीय, सामाजिक व आर्थिक उद्देशाच्या आड येणाऱ्या संस्थांना ताब्यात घेण्याचा किंवा या संस्थांना शक्तिहीन करून टाकण्याचा नरेंद्र मोदी सरकारचा झपाटा पाहिला तर राष्ट्रीय हरित लवाद लवकरच या सरकारचं लक्ष्य ठरल्यास नवल वाटू नये. राष्ट्रीय हरित लवाद अधिनियम, २०१० अन्वये स्थापन झालेल्या या संस्थेनं पर्यावरणाचं संरक्षण, वन व नैसर्गिक स्रोतांचं संवर्धन, पर्यावरणविषयक कायदेशीर अधिकारांची अंमलबजावणी, आणि पर्यावरणीय हानीमुळं मालमत्तेची हानी सहन केलेल्या लोकांना भरपाई व दिलासा देणं अशा संदर्भातील प्रकरणांत कार्यवाही करणं अपेक्षित आहे. पर्यावरणविषयक प्रकरणांची सुनावणी वेगानं व्हावी आणि आवश्यक तज्ञता

असलेल्या व्यक्ती या प्रक्रियेत सहभागी असाव्यात, या उद्देशानं ही संस्था स्थापन करण्यात आली होती. केवळ सर्वोच्च न्यायालय या लवादाच्या निर्णयाच्या विरोधी निकाल देऊ शकतं. त्यामुळं विकासात्मक प्रारूप अमलात आणायची घाई झालेल्या सरकारसाठी पर्यावरणविषयक प्रश्नांबाबत स्वतंत्र निर्णय घेऊ शकणारा हरित लवाद अडचणीचा ठरणं ओघानंच आलं.

मे २०१४मध्ये मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर काही महिन्यांमध्येच अशी चर्चा सुरू झाली होती की राष्ट्रीय हरित लवादाची सूत्रं हाती घेण्याच्या दृष्टीनं आता पावलं टाकली जातील. राष्ट्रीय हरित लवाद अधिनियमाला दुबळं करण्याची थेट कृती झाली नसली, तरी वित्त अधिनियम, २०१७च्या मार्गानं केलेले बदल हेच करत आहेत. या कायद्यातील तरतुदी विविध लवादांना लागू होणार आहेत आणि त्यात राष्ट्रीय हरित लवादाचाही समावेश आहे. हरित लवादांसारख्या लवादांच्या सदस्यांची पात्रता आणि सेवाविषयक अटींमध्ये काही महत्त्वाचे बदल वित्त विधेयक, २०१७नं केले आहेत. सध्याच्या तरतुदींनुसार, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त अथवा विद्यमान न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती असा अनुभव असलेल्या व्यक्तीलाच राष्ट्रीय हरित लवादाचा अध्यक्ष नेमता येतं. थोडक्यात, हरित लवादाचा अध्यक्ष न्यायिक बाबींसंदर्भात अनुभवी असणं गरजेचं असतं. परंतु, नवीन नियमांनुसार, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदासाठी पात्र ठरणारी कोणीही व्यक्ती या लवादाचं अध्यक्षपद स्वीकारू शकते. त्यामुळं, एखाद्या उच्च न्यायालयात दहा वर्षं वकील म्हणून कार्यरत असलेली व्यक्ती, तांत्रिकदृष्ट्या सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश बनण्यासाठी पात्र ठरत असल्यानं हरित लवादाचा अध्यक्षही बनू शकते. शिवाय, सध्या राष्ट्रीय हरित लवादाचे सदस्य निवडण्याचं काम सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालची समिती करत असे. भविष्यात मात्र ही निवड सरकारी अधिकाऱ्यांमार्फत होणार आहे. या बदलांचा दीर्घकालीन परिणाम लवादाच्या निर्णयांच्या गुणवत्तेवर होईल, कारण न्यायिक अनुभव असलेले वरिष्ठ न्यायाधीश या प्रक्रियेत सहभागी नसतील. यातून लवादाच्या स्वातंत्र्याबाबतही तडजोड केली जाईल. या लवादाला अनेकदा केंद्रातील आणि राज्यांमधील सरकारांच्या कृतींचं मूल्यमापन करावं लागतं, त्यामुळं विद्यमान सरकारच्या दृष्टीनं लवादाचं स्वातंत्र्य संकुचित होणं आवश्यकच ठरतं.

नरेंद्र मोदी यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर परिणामकारक निर्णय देण्याची क्षमता राष्ट्रीय हरित लवादानं आधीच दाखवून दिली आहे. अशा वेळी लवादाच्या स्वातंत्र्याचा संकोच होण्याची शक्यता दुःखद ठरते. गंगा नदीच्या प्रदूषणाबाबत पर्यावरण कार्यकर्ते एम. सी. मेहता यांनी १९८५ साली जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेच्या प्रत्युत्तरादाखल १९८६ साली गंगा कृतियोजनेची पहिल्या टप्प्यातील अंमलबजावणी सुरू करण्यात आली. यामध्ये गंगा नदीचा प्रवाहमार्ग असलेल्या उत्तर प्रदेश, बिहार व पश्चिम बंगाल या राज्यांमधील २५ शहरांचा समावेश होता. १९९३ साली दुसऱ्या टप्प्यातील अंमलबजावणी सुरू झाली आणि त्यात यमुना, दामोदर व महानदी यांसारख्या गंगेच्या उपनद्यांचा समावेश होता. मेहतांच्या याचिकेवरून सुरू झालेला खटला दीर्घ काळ सुरू राहिला, आणि गंगा कृतियोजनेनं नदीच्या प्रदूषणावर काही वरवरचे उपाय तेवढे केले. २०१५ साली मोदी सरकारनं ही योजना नमामि गंगे कार्यक्रम या नावानं पुन्हा सुरू केली आणि नदीसफाईसाठी पाच वर्षांच्या कालावधीकरिता

(२०१५-२०) तब्बल २० हजार कोटी रूपयांची तरतूद केली. यातील सात हजार कोटी रूपयांपेक्षा थोडी जास्त रक्कम आत्तापर्यंत खर्चही झाली आहे, पण प्रत्यक्षात गंगेच्या सफाईबाबत फारशी प्रगती मात्र झालेली नाही.

सर्वोच्च न्यायालयानं २०१४ साली एम. सी. मेहता यांचा खटला राष्ट्रीय हरित लवादाकडे हस्तांतरित केला. या खटल्यात लवादानं दिलेला निकाल मैलाचा दगड ठरणारा असल्याचं म्हटलं जातं आहे. गंगा नदी साफ करण्यावर कोट्यवधी रूपये खर्च करण्यात आले असले, तरी गुणवत्ता किंवा इतर कोणत्याही निकषावर गंगा नदीचा दर्जा सुधारलेला नाही आणि ती अजूनही गंभीर पर्यावरणीय समस्या बनून राहिली आहे, असं निरीक्षण लवादानं निकालावेळी नोंदवलं. नदीपासून दोन्ही बाजूंना १०० मीटरच्या अंतरापर्यंत कोणतंही बांधकाम करू नये, नदीतीरापासून दोन्ही बाजूंना ५०० मीटर अंतरापर्यंत कोणताही कचरा टाकू नये आणि नदीच्या पात्रात कित्येक दशकांपासून सांडपाणी सोडणारे कानपूरमधील चामड्याचे कारखाने दोन आठवड्यांमध्ये हलवावेत, असे आदेश लवादानं दिले. ही निरीक्षणं नदीच्या एका टप्प्यापर्यंतच्या प्रवाहाबद्दलची आहेत. पाच राज्यांमधून वाहात बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या नदीच्या विविध भागांमधील प्रवाहाकडे पद्धतशीररित्या लक्ष देण्याचा विचार न्यायालय करतं आहे.

या निर्णयाच्या रूपानं झालेला न्यायिक हस्तक्षेप स्पष्ट स्वरूपाचा आहे आणि त्याला देखरेख यंत्रणेचा आधार देण्यात आलेला आहे. या यंत्रणेवर न्यायालयाचं लक्ष असणार आहे. पूर्वीसारखी ही प्रक्रिया सुस्त राज्य सरकारांच्या अखत्यारित राहाणार नाही. बदल घडवायचा असेल तर अशा कृती सकारात्मक ठरू शकतात. खासकरून पर्यावरणीय समस्यांच्या बाबतीत अशा स्वतंत्र लवादाची आवश्यकता निकडीची आहे. स्वतंत्र हरित न्यायालयाच्या लाभांविषयी पुनर्मूल्यांकन करण्यासाठी हा निर्णय मोदी सरकारला भाग पाडतो का, ते येत्या काळात स्पष्ट होईल.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.
(८, १५ व २२ जुलैच्या अंकांतून)

**Looking for a Groom**

Parents are looking suitable groom for their daughter 31, 162 cm, well educated, emotionally mature, creatively inclined, good looking, M.S. comp software engineer and well established in USA. Expectations age 30-33, 175 cm, well-cultured, intelligent, compatible, and well established in USA. Please reach us at adformatrimony@gmail.com wi th bio-data and recent pictures for further communication.